आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
९ मे २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाचे नवे सीडीएस म्हणून निवृत्त लेफ्टनंट जनरल एन एस राजा सुब्रमणी यांची तर नवे नौदलप्रमुख म्हणून व्हाईस ॲडमिरल कृष्ण स्वामिनाथन यांची नियुक्ती

- पश्चिम बंगालमधे पहिल्या भाजप सरकारच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी संपन्न/ राज्याचे नववे मुख्यमंत्री म्हणून शुभेंदु अधिकारी यांनी घेतली शपथ

- भारतात अल्पसंख्यक असुरक्षित असल्याचा गैरसमज देशातले आणि देशाबाहेरचे शत्रू पसरवण्याचा प्रयत्न  करत असल्याचा केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांचा आरोप

आणि

- भ्रष्टाचार आणि शेतकरी आत्महत्यांमध्ये महाराष्ट्र देशात पहिल्या स्थानी असल्याबद्दल ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांची राज्य सरकारवर टीका

**<><><><><>**

निवृत्त लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांची देशाचे पुढील सीडीएस अर्थात संरक्षण दल प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सध्याचे सीडीएस, जनरल अनिल चौहान यांचा कार्यकाळ ३० मे रोजी संपत आहे. याच दिवशी जनरल एन. एस. राजा सुब्रमणी, पदभार स्वीकारतील आणि संरक्षण मंत्रालयाच्या लष्करी व्यवहार विभागाचे सचिव म्हणूनही काम पाहतील. लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी १ सप्टेंबर २०२५ पासून राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयात लष्करी सल्लागार आहेत.

व्हाईस ॲडमिरल कृष्ण स्वामिनाथन् यांची नौदलाचे आगामी प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते सध्या नौदलाच्या पश्चिम विभागाचे फ्लॅग ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ म्हणून कार्यरत आहेत. त्यांना नौदलात कार्यान्वयन, सामरिक आणि कर्मचारी व्यवस्थापन पदांवर जवळपास चार दशकांचा अनुभव आहे.  सध्याचे नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश कुमार त्रिपाठी येत्या ३१ मे रोजी सेवानिवृत्त होणार आहेत.

**<><><><><>**

भाजपची विचारधारा पश्चिम बंगालच्या जनतेनं स्वीकारली असल्याचं पश्चिम बंगालमधल्या भाजपच्या नेत्रदीपक यशातून दिसून येतं. हा सत्ताबदल राज्यात विकासाचा मार्ग मोकळा करेल, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. पश्चिम बंगालमध्ये झालेल्या शपथविधी सोहळ्यापूर्वी गडकरी माध्यमांशी बोलत होते.

पश्चिम बंगालमधे भाजपचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शुभेंदु अधिकारी यांनी आज शपथ घेतली. कोलकात्यातल्या ब्रिगेड परेड मैदानात एका भव्य समारंभात राज्यपाल आर.एन. रवी यांनी अधिकारी यांना राज्याचे नववे मुख्यमंत्री म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. पाच कॅबिनेट मंत्र्यांनी देखील या वेळी शपथ घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, अमित शहा आणि इतर केंद्रीय मंत्री तसंच भाजप-एनडीए शासित राज्यांचे मुख्यमंत्री या कार्यक्रमाला हजर होते. भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे सहकारी आणि पश्चिम बंगालमधले भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते माखनलाल सरकार या शपथविधी सोहळ्याला उपस्थित होते. महाराष्ट्रातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्यासह एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार हे दोन्ही उपमुख्यमंत्री शपथविधीला हजर होते.

<><><><><>

पुदुचेरीत सर्वाधिक बहुमत मिळवणाऱ्या एआयएनआरसी चे प्रमुख एन रंगासामी यांनी काल नायब राज्यपाल के कैलाशनाथन यांची भेट घेऊन सरकारस्थापनेचा दावा केला. येत्या १३ मे रोजी रंगासामी पाचव्यांदा पुदुचेरीच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील, अशी माहिती सूत्रांनी दिली.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या कर्नाटक आणि तेलंगणच्या दौऱ्यावर जाणार आहेत. उद्या ते बंगळुरूमधे आर्ट ऑफ लिव्हिंगच्या ४५व्या वर्धापनदिन सोहळ्याला उपस्थित राहतील. हैद्राबादमधे सुमारे ९ हजार ४०० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासयोजनांचं उद्घाटन आणि पायभरणी प्रधनमंत्र्यांच्या हस्ते होईल. यात हैद्राबाद पणजी आर्थिक कॉरिडॉरचा समावेश आहे. वरंगळ इथल्या पीएम मित्रा या वस्त्रोद्योग संकुलाची पायभरणी ते करतील.

त्यानंतर प्रधानमंत्री गुजरातला जाणार आहेत. सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाला ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित सोहळ्यात ते सहभागी होणार आहेत. मंदिरातला कुंभाभिषेक आणि ध्वजारोहण सोहळा त्यांच्या हस्ते होणार असून ते विशेष पूजाही करतील.

प्रधानमंत्री नंतर वडोदरा इथं सरदारधाम वसतीगृहाचं उद्घाटन करतील.

<><><><>

नागरिकांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या हेतूनं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरु केलेल्या योजनांमुळे समाजातल्या वंचित आणि दुर्लक्षित घटकांना विमा सुरक्षा मिळू लागली आहे, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना आणि अटल पेन्शन योजनेला ११ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात त्या काल बोलत होत्या. या योजनांच्या माध्यमातून नागरिकांना जीवनातल्या  अस्थिरतेविरुद्ध लढण्याचं सामर्थ्य प्राप्त होऊन दीर्घमुदतीसाठी आर्थिक सहाय्य मिळत आहे, या योजनांमध्ये नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर नोंदणी केली असून कोट्यवधी रुपयांच्या दाव्यांचा निपटारा करण्यात आला आहे, असं सीतारामन यांनी सांगितलं. डिजिटल स्वरुप,  नोंदणी आणि दाव्यांची  सुलभ प्रक्रिया हे या योजनांचं बलस्थान असल्याचं केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यावेळी म्हणाले.

<><><><>

देशात अल्पसंख्यक नागरिक असुरक्षित असल्याचा आरोप केंद्रीय अल्पसंख्यक मंत्री किरेन रीजीजू यांनी फेटाळून लावला आहे. देशातले आणि देशाबाहेरचे भारताचे शत्रू हा गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला. पारशी समुदायानं भारतासाठी दिलेल्या योगदानाच्या संदर्भात आयोजित परिषदेत ते मुंबईत आज बोलत होते. पारशी समुदायाने मोठ्या प्रमाणात दानधर्म केला. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय खेळाडू सहभागी झालेल्या पहिल्या दोन ऑलिम्पिकचा सर्व खर्च पारशी नागरिकांनी उचलला होता, याची आठवण त्यांनी यावेळी करुन दिली.  पारशी समुदायातल्या नागरिकांची संख्या कमी होत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. त्यासाठी सरकारनं २०१३-१४ मध्ये जियो पारशी योजना आणली होती. त्याला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचं रिजीजू यावेळी म्हणाले.

<><><><>

आगामी मान्सूनच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून पालघर जिल्हा प्रशासनानं अन्नधान्य आणि औषधांचा पुरेसा साठा आणि जिल्ह्यातल्या दुर्गम भागांसाठी आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा सज्ज ठेवावी असे निर्देश पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी दिले आहेत. त्यांनी

आज मान्सूनपूर्व कामांच्या प्रगतीचा आणि खरिपाच्या पिकांच्या दृष्टीनं केलेल्या नियोजनाचा आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. या भागात अतिवृष्टी झाल्यास दुर्गम भागातल्या नागरिकांना त्याची झळ बसू नये, याची खबरदारी घ्यावी असं नाईक यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भ्रष्टाचार आणि शेतकरी आत्महत्यांमध्ये महाराष्ट्र देशात पहिल्या स्थानी असल्याचं NCRB म्हणजेच राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या २०२४ च्या अहवालातून समोर आलं आहे. महिलांवरच्या अत्याचारात राज्याचा दुसरा क्रमांक आहे. २०२४ मध्ये राज्यात ३ हजार ८२४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. तर ४७ हजार ९५४ घटनांमध्ये महिलांवर अत्याचार झाले. तसंच भ्रष्टाचाराची ७२१ प्रकरण उघड झाली आहेत. यावरुन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. सत्ताधाऱ्यांनी मंगल देशा, पवित्र देशा ही राज्याची ओळख पुसून टाकली असल्याचा आरोप त्यांनी केला. या मुद्द्यांवरुन सरकारला विधीमंडळात विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तर मिळाली नसल्याचंही ते म्हणाले.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात बोईसर तारापूर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातून घातक रासायनिक घनकचऱ्याची अवैध वाहतूक करणारा एक ट्रक बोईसर पोलिसांनी जप्त केला आहे. बेटेगाव पोलीस चौकीजवळ वाहनांची तपासणी करत असताना हे प्रकरण उघडकीला आलं. जप्त केलेल्या ट्रकमध्ये सुमारे २०० किलो क्षमतेचे ६९ प्लास्टिक ड्रम्स होते. त्यातून तीव्र दुर्गंधी येत असल्यानं त्यात रासायनिक कचरा असल्याची दाट शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. बोईसर पोलिसांनी याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला पत्र लिहून कळवलं असून, नमुन्यांची तपासणी करण्याची विनंती केली आहे. या तपासणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढची कारवाई केली जाईल, असं पोलिसांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

भंडारा शहरात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं ‘मेफेड्रॉन’ या अत्यंत धोकादायक आणि प्रतिबंधित अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या एका इसमाला अटक केली. स्थानिक गुन्हे शाखेनं मिळालेल्या गुप्त माहितीनुसार धाड टाकून आरोपी कपिल खोब्रागडे याच्याकडून १२ लाख ६५ हजार रुपयांचं ‘मेफेड्रॉन’ जप्त केलं.

<><><><><>

मुंबई विद्यापीठाच्या प्रशासनाने विना अनुदानित विभागाच्या शिक्षक पदांच्या भरती प्रक्रियेत अर्ज सादर करण्याच्या मुदतीत वाढ केली आहे. १७ एप्रिल रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने संचालक, प्राध्यापक आणि सहाय्यक प्राध्यापक पदासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची मुदत ११ मे पर्यंत  वाढवली असून ऑनलाइन अर्जाची छापील प्रत सादर करण्याची मुदत १५ मे संध्याकाळी ५ वाजेपर्यंत निश्चित केली आहे.

//<><><><><>//